# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.02.2026** **वार- शुक्रवार**

---

**<u>मराठीभाषा</u>**

कविवर्य कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून सर्वत्र उत्साहात साजरा होत आहे. प्रदर्शनं, स्पर्धा, मेळावे या द्वारे मायमराठीचं वैभव जपण्याचा निर्धार केला जात आहे.

अक्षरधारा बुक गॅलरीतर्फे स्मरण कुसुमाग्रजांचे या कार्यक्रमाचं आयोजन आज करण्यात आलं. स्नेहा अवसरीकर, नेहा वैशंपायन आणि स्वाती प्रभुमिराशी यांनी हा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाच्या निमित्तानं पुणेकर रसिकांनी मराठी भाषेचे संचित आणि मराठी भाषेच्या अस्मितेचा अनुभव घेतला .

**<u>ससून-विधानसभा</u>**

ससून सर्वोपचार रुग्णालयातील अपघात आणि शल्यचिकित्सा अतिदक्षता विभाग सुसज्ज करण्याची गरज असून जंतुसंसर्ग नियंत्रण परिक्षण करून त्यातही सुधारणा करण्याची मागणी आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे केली. मात्र रुग्णालयातील नवजात अर्भकांसाठी असणाऱ्या अतिदक्षता विभागातील डॉक्टर्स, परिचारिका हे विशेष प्रशिक्षित आहेत. त्या विभागात संसर्ग होण्याचं प्रमाणही अत्यल्प असल्याची प्रशंसनीय आहे, असे शिरोळे यांनी सांगितलं.

**<u>विमा</u>**

पुण्यासह राज्यातल्या सर्व सार्वजनिक विद्यापीठं आणि संलग्न महाविद्यालयांतल्या विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनानं वैयक्तिक अपघात विमा लागू करणं अनिवार्य केलं आहे. याआधी ही योजना ऐच्छिक स्वरूपाची होती. स्वामी विवेकानंद युवा सुरक्षा योजने' अंतर्गत पुढील तीन वर्षांसाठी इन्श्युरन्स ब्रोकर्स नोडल एजन्सीची निवड करण्यात आली आहे. ज्या विद्यापीठांमध्ये कमी हप्त्यात अधिक संरक्षण देणारी स्वतंत्र विमा योजना आधीपासून कार्यरत असेल, त्या विद्यापीठांना संबंधित योजना सुरू ठेवण्याची मुभा देण्यात आली आहे. मात्र यासाठी उच्च शिक्षण संचालनालयाच्या संचालकांची पूर्वसंमती आवश्यक राहणार आहे.

**परिषद**

पुण्याच्या डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठातल्या ग्लोबल बिझनेस स्कूल अँड रिसर्च सेंटर इथं "डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन अँड ग्रीन ग्रोथ" या विषयावर पाचवी आंतरराष्ट्रीय परिषद काल पार पडली. दोन दिवसांच्या या परिषदेत नवोन्मेष, शाश्वत विकास आणि सुशासन या विषयांवर सखोल विचारमंथन करण्यात आलं. सर्व स्वीकृत संशोधन निबंध टेलर अँड फ्रान्सिसच्या स्कोपस-सूचीबद्ध परिषद कार्यवृत्तात प्रकाशित होणार असून त्यामुळे संशोधकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळणार आहे. परिषदेत 12 देशांतल्या साडेतीनशे हून अधिक संशोधन निबंध सादरकर्ते तसंच संशोधक, उद्योगतज्ज्ञ आणि विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

**कार्यशाळा**

वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर डिजिटल व्यवहार अधिक सुरक्षित करण्यासाठी पिंपरी-चिंचवड आणि पुणे सायबर क्राईम पोलिसांसाठी 'सायबर क्राईम' या विषयांवरील एका कार्यशाळेचं काल आयोजन करण्यात आलं होतं. सध्या 'डिजिटल अरेस्ट' , बनावट ट्रेडिंग ॲप्स आणि गुंतवणूक घोटाळ्यांचं प्रमाण वाढलं असून, सायबर गुन्हेगार 'सोशल इंजिनीअरिंग' , कृत्रिम बुद्धिमत्ता आणि 'डीपफेक' तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना जाळ्यात ओढत आहेत. या पार्श्वभूमीवर सायबर गुन्हा

घडल्यानंतरच्या 'गोल्डन अवर' मध्ये संशयित खाती तात्काळ गोठवण्यासाठी फोनपेच्या विशेष पोर्टलचा वापर कसा करावा, याचं प्रात्यक्षिकही देण्यात आलं.

**राष्ट्रीयविज्ञानदिन**

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त पुण्यातील आयुका, आयसर, जीएमआरटी आणि पुणे वेधशाळा यांसारख्या नामवंत संस्थांमध्ये प्रदर्शने, शास्त्रज्ञांशी संवाद आणि विविध वैज्ञानिक प्रयोगांचे आयोजन करण्यात आले आहे. उद्या साजऱ्या होणाऱ्या विज्ञान दिनी आयुकातील अद्ययावत संशोधन सुविधा, संशोधन पाहण्याची संधी दिवसभर मिळणार आहे. तर राष्ट्रीय रेडिओ खगोलभौतिकी केंद्र अर्थात एनसीआरए नं आणि १ मार्च रोजी नारायणगाव तालुक्यातल्या खोडद इथं विज्ञान प्रदर्शनाचं आयोजन केलं आहे. या वेळी विविध वैज्ञानिक प्रयोग, लघुपट दाखण्यात येणार अशी माहिती 'एनसीआरए' चे प्रशासकीय अधिकारी ए. बी. जोंधळे यांनी दिली.

**मेट्रो**

पुणे मेट्रो रेल प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याला बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्ड्स 2026 मध्ये राष्ट्रीय स्तरावर सन्मानित करण्यात आलं आहे. पुणे शहरातल्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवून आणत शहराच्या सामाजिक-आर्थिक विकासात दिलेल्या भरीव योगदानाची दखल घेऊन, पुणे मेट्रोला IMPACT या श्रेणीत हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. नवी दिल्लीत नुकत्याच झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात महामेट्रोच्या वतीनं अतुल गाडगीळ यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

**साखर-कोटा**

केंद्र सरकारनं मार्च महिन्यासाठी 22 लाख 50 हजार मेट्रिक टन साखरेचा कोटा खुला केला आहे. मार्च महिन्यातील नवीन निविदा उघडताच दर वाढण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. सध्या घाऊक बाजारात एस 30 गोल्ड साखरेचा क्विंटलचा दर 4 हजार ते 4 हजार 50 रुपयांवर स्थिर आहे.

हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी ६ वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.